# प्रकरण - दुसरे
# संदर्भ साहित्याचे समालोचन.

२.०१ प्रास्ताविक.

२.०२ संबंधित साहित्याचा अभ्यास.

२.०३ संबंधित संशोधनाचे समालोचन.

२.०४ समारोप.

संदर्भ.

# प्रकरण दुसरे
# संदर्भ साहित्याचे समालोचन.

## २.०१ प्रास्ताविक.

लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशास्कीय समस्यांचा अभ्यास या विषयावरील संशोधन कार्य सुरू करण्यापूर्वी संशोधकाने यापूर्वी निरनिराळ्या विद्यापीठातून झालेल्या संशोधनाचा अभ्यास केला. या संशोधन अभ्यासात प्रामुख्याने शैक्षण्िक संशोधनावरती लक्ष केंद्रित केले. प्रस्तुत विषयात प्रशासकीय सम्स्यांचा अभ्यास असल्याने जे संशोधन शैक्षणिक प्रशासनाशी निगडीत आहे, अशा संशोधनाच्या अभ्यासावरती अधिक भर दिला.

संशोधकाने यापूर्वीच्या संशोधकांनी प्रस्तुत विषयाची मांडणी कशी केली आहे हे जाणून घेतले. त्यांच्या संशोधनाचा विषय कोणता? कार्यक्षेत्र कोणते? संशोधनाचा उद्देश कोणता? संशोधन कोणत्या विद्यापीठांतर्गत झाले? कोणत्या वर्षी झाले? संशोधनासाठी कोणत्या संशोधन पध्दतीचा अवलंब केला? संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती कोणत्या मार्गाने जमा केली? त्यांनी कोणत्या संदर्भ ग्रंथांचा अभ्यास केला? संशोधनाचे कोणते निष्कर्ष मांडले? कोणत्या शिफारशी केल्या? या सर्व घटकांचा आढावा घेण्याचे संशोधकाने ठरविले. त्यापैकी या संशोधनास अनुषंगिक अशा प्रमुख संशोधनाचे समालोचन येथे दिले आहे.

## २.०२ संबंधित साहित्याचा अभ्यास.

संशोधनाच्या विविध पध्दती, सर्वेक्षण पध्दतीची तात्विक माहिती, नमुना निवड इ. बाबतीत सखोल माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने पुढील पुस्तकांचे वाचन करून त्यांचा संशोधन कार्यासाठी उपयोग केला.

1. Educational Investigations In Indian University (1939 - 1961), NCERT, New Delhi - 1961.
2. The Third Indian Year Book of Indian Research, NCERT, New Delhi - 1968.
3. Second National Survey of Secondary Teacher Education, M.D. Pandey, NCERT, New Delhi - 1969.

4. A Survey of Research Study In Education, M.B. Buch.
Faculty of Education and Psychology, Maharaja Sayajirao University of Baroda, India - 1979.

5. Second Survey of Research In Education, M.B. Buch, Scoiety for Educational Research and Development, Baroda, India - 1979.

6. Educational Research in University of Bombay,
Dr. Mrs. Pratibha Dev (Education)
Department of Education University of Bombay - 1982.

7. Educational Research in Universities in Maharastra Platinum Jubilee Year, N.K. Patole, S.T. College, Bombay - 1982.

8. Third Survey of Research in Education , 1978 - 82
M.B. Buch, NCERT, New Delhi - 1986.

9. Fourth Survey of Research in Education, 1983 - 88.
M.B. Buch, NCERT, New Delhi - 1991.

10. Fourth Survey of Research in Education, 1983 - 88, Vol - II
M.B. Buch, NCERT, New Delhi - 1968

11. Fifth Survey of Research in Education.
M.B. Buch, NCERT, New Delhi .

12. Educational Administration in the Zilla Parishad in Maharastra, A Pilot Study, N.R. Inamdar.

१३. मुळे रा. शं., उमाठे वि. तू., शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर - १९७७.

१४. भिंताडे डॉ. वि.रा., शैक्षणिक संशोधनाची पध्दती, नुतन प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती - १९८९.

१५. बापट डॉ. भा. गो., शैक्षणिक संशोधन, नुतन प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती - १९८८.

## २.०३ संबंधित संशोधनाचे समालोचन.

संशोधकाने प्रस्तुत विषयाशी निगडीत यापूर्वी झालेल्या काही संशोधनाच अभ्यास केला त्याचे समालोचन पुढे देण्यात येत आहे.

**१. बाजपाई एम.**

"उत्तरप्रदेशातील स्वातंत्र्योत्तर काळातील माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा अभ्यास".

पीएच. डी. पदवी, कानपूर विद्यापीठ - १९८४.

**उद्दिष्टचे :-**

१. उत्तर प्रदेशातील माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाची माहिती मिळविणे.

२. प्रशासनामध्ये सुधारणा करण्यासाठी उपाय सुचविणे.

**कार्यपध्दती :-**

शासनाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारे अहवाल व परिपत्रके याचे आधारे संशोधकाने संशोधन कार्यासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविली.

**निष्कर्ष :-**

१. माध्यमिक शिक्षण हे स्थानिक स्वराज्य संस्था व अन्य स्वयंसेवी संस्थांद्वारे दिले जाते.

२. स्थानिक स्वराज्य संस्थाद्वारा चालविल्या जाणाऱ्या शाळांवरती शासनाची कडक नजर असते. कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या जातात. अशा शाळांतील प्रशासन गतीशील असते.

३. स्वयंसेवी संस्था व धार्मिक संस्थांद्वारा चालविल्या जाणाऱ्या शाळांच्या बाबतीत तेथील प्रशासन अधिकाराचा दुरूपयोग करते.

४. खाजगी शिक्षण संस्थांद्वारा चालविल्या जाणाऱ्या शाळा व शासनाकडून चालविल्या जाणाऱ्या शाळा यांच्या प्रशासनात मोठा फरक आहे. शासनाकडून चालविल्या जाणाऱ्या शाळा व्यवस्थित चालविल्या जातात.

५. जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या शाळा निरीक्षकांच्या कामात वाढ झाली आहे. त्यामुळे शाळा तपासनी हे कार्य लक्षपूर्वक होत नाही.

२. बारुह एच.

"आसाम राज्यातील स्वातंत्र्योत्तर काळातील माध्यमिक शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास"

१९४७ ते १९७७, पीएच्. डी., शिक्षणशास्त्र, गुवाहाटी विद्यापीठ - १९८३.

**उद्दिष्ट्ये :-**

१. आसाम राज्यातील स्वातंत्र्योत्तर कालखंडातील माध्यमिक शिक्षणाच्या परिस्थितीचा आढावा घेणे.

२. माध्यमिक शिक्षणाच्या अडचणी व उणीवा यांचा शोध घेणे.

३. माध्यमिक शिक्षणाच्या विकासासाठी उपाय सूचविणे.

**कार्यपध्दती :-**

शासकीय अहवाल, परिपत्रके, दप्तर इत्यादी माध्यमांद्वारे संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती मिळविली.

अधिकारी व मुख्याध्यापक यांच्याशी चर्चा करून तसेच प्रश्नावलीद्वारे माहिती मिळविली.

**निष्कर्ष :-**

१. आसाम राज्यातील शैक्षणिक प्रशासन ब्रिटिशकालीन पध्दतीचे आहे.

२. सामाजिक बदलाचा विचार न करता स्वातंत्र्योत्तर काळखंडात ३० वर्षानंतर देखील आसाममधील शैक्षणिक प्रशासन पारंपारिक पध्दतीने चालू आहे. त्यात नवीन कल्पनांचा अंर्तभाव नाही.

३. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शैक्षणिक प्रशासनास विशेष महत्त्व प्राप्त झाले असले तरीही पंरपरागत पध्दतीच्या अवलंबामुळे ते प्रशासन दुबळे बनले आहे.

४. स्वातंत्र्योत्तर कालखंडात माध्यमिक शिक्षणाची गुणात्मक वाढ होण्याऐवजी संख्यात्मक वाढ झाल्याने माध्यमिक शिक्षणाची स्थिती समाधानकारक नाही.

५. माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनात अनेक दोष आहे.

६. माध्यमिक शाळेच्या प्रमुखास प्रशासक म्हणून विशेष अधिकार नाहीत.

७. माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाच्या पूणर्रचनेची गरज आहे.

३. देवी बी.

"आसाम राज्यात १९६४ - १९७४ या कालखंडात माध्यमिक शिक्षणात झालेला बदल आणि त्याचा राज्याच्या उच्च शिक्षणावरील प्रभाव."

पीएच्. डी., शिक्षणशास्त्र, गुवाहाटी विद्यापीठ - १९८७.

**उद्दिष्टये :-**

१. १९६४ - १९७४ काळातील आसाम राज्यातील माध्यमिक शिक्षणाच्या बदलाचा उच्च शिक्षणावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

२. माध्यमिक शिक्षणाच्या समस्येचा अभ्यास करून त्याचा उच्च शिक्षणावरील परिणाम विषद करणे.

**कार्यपध्दती :-**

निवडक लोकांच्या मुलाखती घेऊन संशोधनासाठी आवश्यक असेलेली माहिती मिळविली. खागजी व बहुउद्देशीय शाळांना भेटी देवून माहिती मिळविली. समाजातील भिन्न स्तरातील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन माहिती मिळविली. विद्यार्थी, शिक्षक आणि प्रशासक यांच्याकडून प्रश्नावलीद्वारा माहिती मिळविली.

**निष्कर्ष :-**

१. आसाम राज्यात माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत अनेक महत्वपूर्ण बदलाची आवश्यकता आहे.

२. हे बदल सर्व स्तरीय असावेत .

३. माध्यमिक स्तरावर रचना, प्रशासन, अध्यापन, सहशालेय उपक्रम, परिक्षण इत्यादीचे बाबतीत बदल गरजेचा आहे.

४. शिक्षणात झालेल्या संख्यात्मक वाढीचा गुणात्मक वाढीवर प्रतिकूल प्ररिणाम झाला आहे.

५. वाढत्या शिक्षण संस्थेमुळे शैक्षणिक वातावरण गढूळ झाले आहे.

६. माध्यमिक शिक्षणाच्या दर्जा विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवा जागृत करण्यात अपयशी ठरला आहे.

७. उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण धोक्याचे प्रतिक आहे.

८. माध्यमिक शिक्षणाच्या पूनर्रचनेची गरज आहे.

४. **इनामदार एन. आर.**

"महाराष्ट्रातील जिल्हा परिषदामधील शैक्षणिक प्रशासन, पथदर्शी अभ्यास."
आय. सी. एस. एस. आर., नवी दिल्ली - १९७१.

**उद्दिष्ट्ये :-**

१. जिल्हा परिषदांचा शिक्षणावर असणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करणे.
२. प्राथमिक शिक्षणाच्या वाढीसाठी ग्रामीण भागातील नेतृत्वाने (जि.प.,पं.स.) केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

**कार्यपध्दती :-**

संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांकडून व वेल्हे तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांकडून प्रश्नावलीद्वारा अवश्यक ती माहिती मिळविली. जिल्हा परिषदेचे शैक्षणिक प्रशासन जाणून घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी यांचेशी चर्चा करून माहिती मिळविली. याचबरोबर अनेक पालकांना भेटी देवून, चर्चा करून स्थानिक शैक्षणिक समस्यांची माहिती मिळविली.

**निष्कर्ष :-**

१. जिल्हा परिषदे अंतर्गत असणारे शैक्षणिक प्रशासन व्यवस्थीतपणे काम करत नाही. ते दोषी आहेत.
२. जिल्हा पातळीवर संपूर्ण शैक्षणिक प्रशासनाची पूनर्रचना करण्यात यावी.
३. ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन सुधारले पाहिजे. प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढली पाहिजे.
४. प्राथमिक शिक्षणाच्या सुधारणेशिवाय माध्यमिक शिक्षणाचा दर्जा सुधारू शकणार नाही.

५. **कुलकर्णी एन्. बी.**

"महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाचे पर्यवेक्षन व तपासणी :
विशेष संदर्भ - मराठवाडा विभाग."
पीएच्.डी. शिक्षणशास्त्र, पुणे विद्यापीठ - १९८२.

**उद्दिष्ट्ये :-**

१. प्राथमिक शिक्षणाचे पर्यवेक्षण आणि तपासणीच्या पध्दतीचा अभ्यास करून सुधारणा सुचविणे.

२. अध्ययन - अध्यपन प्रक्रिया परिणामकारक बनविण्यासाठी शिक्षकांना उत्तेजित करणे, मार्गदर्शन करणे.

३. प्राथमिक शाळेचे शिक्षक आणि मुख्याध्यापक यांचा पर्यवेक्षण आणि तपासणी या बाबतचा दृष्टिकोन समजून घेणे.

४. शिक्षकांच्या अध्यापनातील मुख्य समस्यांचा शोध घेऊन त्यावर मात करण्यासाठी उपाय सुचविणे.

५. शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्या व्यवसायिक प्रगतीतील अडचणींचा शोध घेवून त्या दूर करण्यासाठी उपाय सुचविणे.

६. पर्यवेक्षन आणि तपासणी बाबतचा संबंधीत अधिकाऱ्यांच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

**कार्यपध्दती :-**

संशोधन कार्यासाठी पर्यवेक्षण पध्दतीचा अभ्यास करून, विभागातील कांही शाळा नमुना निवड पध्दतीने निवडूण त्या शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक यांचेकडून प्रश्नावली द्वारा माहिती मिळविली.

**निष्कर्ष :-**

१. प्रशासन आणि तपासणी यांचेत निश्चित स्वरूपात फरक नसून एकाच अधिकाऱ्यांना दोन्ही प्रकारची कामे पार पाडावी लागतात.

२. मुख्याध्यापक आणि तपासणी अधिकारी दोघेही अधिकाऱ्याप्रमाणे कार्य करतात.

३. तपासणी पथकातील सदस्यांची निवड करण्यासाठी योग्य पध्दती अस्तित्वात नाही.

४. प्रशिक्षित पर्यवेक्षकांचा अभाव आहे.

५. शिक्षकांच्या कांमाचे मुल्यमापण करण्यासाठी ठरविक संहिता नाही.

६. तपासणी अधिकारी व्यापक प्रशासकीय कामाच्या दबावात आहे.

७. अत्यंत कमी (८.५ टक्के) तपासणी अधिकारीच पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहेत.

८. केवळ ५० टक्के तपासणी अधिकारी शाळेची तपासणी निर्धारीत वेळेत पूर्ण करतात.

९. तपासणी अधिकारी फक्त अध्यापन पध्दती, शैक्षणिक साहित्याचा वापर, शालेय प्रशासन, शालेय शिक्षण, शाळा राबवत असलेले विविध शैक्षणिक उपक्रम एवढ्याच बाबींची तपासणी करतात.

१०. ४२ टक्के तपासणी अधिकारी तपासणी केल्यानंतर शिक्षकांशी नेमकी कशाची तपासणी केलेली आहे याबाबत चर्चा करत नाहीत.

११. जवळपास ७६ टक्के तपासणी अधिकारी पालकांची बैठक बोलावून विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांवर चर्चा करतात.

१२. तपासणी अधिकाऱ्यांस नमुना पाठ घेण्यात, मार्गदर्शन करण्यात अत्यंत कमी प्रमाणात आवड आहे.

१३. ७० टक्के मुख्याध्यापक कार्यालयीन कामासाठी सहशिक्षकांचे मदत घेतात.

१४. मुख्याध्यापकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय नाही.

१५. ७८ टक्के शिक्षकांचे मत असें आहे की मुख्याध्यापकांनी दिलेल्या सुचना उपयोगाच्या नसतात.

१६. ९३ टक्के शिक्षकांचे मत असे आहे की तपासणीनंतर तपासणी अधिकारी वैयक्तिक मार्गदर्शन करत नाहीत.

१७. ५८ टक्के शिक्षकांना अवांतर वाचनाची सवय नाही.

**६. मिश्रा बी. एम्.**

"ओरिसातील शैक्षणिक प्रशासन".

डी.लिट. शिक्षणशास्त्र, उतकल विद्यापीठ - १९८४

**उद्दिष्ट्ये :-**

१. शिक्षणाची रचना व कार्य यांचा शिक्षणाच्या ध्येय प्राप्तीसाठी असलेला संबंध अभ्यासने.

२. शैक्षणिक प्रशासनाचा अभ्यास करणे

३. उद्दिष्ट प्राप्तीसाठी प्रशासनाने केलेल्या यशस्वी प्रयत्नांचा अभ्यास करणे.

४. राज्यातील शिक्षणांच्या मागासलेपणाबाबत प्रशासकांच्या भूमीकेचा अभ्यास करणे.

**कार्यपध्दती :-**

संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी संशोधकांने विविध शासकीय परिपत्रके व अहवाल यांचे वाचन केले. निवडक लोकांच्या मुलाखती घेतल्या प्रश्नावलीद्वारा प्रशासक, शिक्षक यांच्याकडून आवश्यक ती माहिती मिळविली. न्याय प्रविष्ट असलेल्या काही प्रकरणांचा अभ्यास केला. २० शिक्षण संस्थेंना प्रत्यक्ष भेटी देवून आवश्यक ती माहिती मिळविली.

**निष्कर्ष :-**

१. ओरिस राज्यात शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रशासकात उत्तम आणि प्रभावशाली प्रशासकांचा अभाव आहे.

२. ओरिसा सरकारकडे शिक्षण विभागात नियोजन आणि अंमतबजावणी बाबतीत योग्य अशा मार्गदर्शकांचा अभाव आहे.

३. ओरिसा राज्यात दीर्घकालीन व प्रभावशाली अशी शिक्षण प्रणाली नाही.

४. याचा परिणाम म्हणून राज्यात उत्तम शैक्षणिक नियोजन नाही.

५. शिक्षणावर होणारा दरडोई खर्च कमी कमी होत आहे.

६. याचा वाईट परिणाम वेतन, शालेय इमारत, शैक्षणिक साहित्य, इतर साहित्य व इतर भौतिक सुविधा याचवर झाला आहे.

७. शिक्षणावर होणाऱ्या खर्चाची तरतूद ही प्रामुख्याने राजकीय विचारसरणीवरच अवलंबून आहे.

८. जनतेस शिक्षणाकडे प्रवृत्त करण्यासाठी व विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात नाहीत.

९. प्रभावी आणि आकर्षक व्यवसाय शिक्षणाशिवाय उच्च शिक्षणाची केवळ मागणी वाढत आहे.

१०. शैक्षणिक प्रशासनात होत असलेल्या राजकीय हस्तक्षेपामुळे प्रशासन कमकुवत बनत आहे.

११. अनेक प्रशासकांनी त्यांनी धारण केलेल्यापदास आवश्यक असणारी शैक्षण्कि पात्रता धारण केलेली नाही.

७. मिश्रा रामकिशोर.

"फैजाबाद विभागातील माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास."

पीएच्.डी. शिक्षणशास्त्र, अवध विद्यापीठ - १९८३.

**उद्दिष्ट्ये :-**

१. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या फैजाबाद विभागतील ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास करणे.

२. फैजाबाद विभागाच्या सर्वसाधारण शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

३. शासन, नियंत्रक, पर्यवेक्षक आणि व्यवस्थापन यांचा ग्रामीण विभागातील माध्यमिक शिक्षणाबाबत असेलेला वर्तमान दृष्टिकोन अभ्यासने.

४. मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या प्रशासकीय भूमिका व सेवाशर्ती यांचा अभ्यास करणे.

**कार्यपध्दती :-**

सर्वेक्षण पध्दतीने संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती मिळवीली. फैजाबाद विभागातील ग्रामीण भागातील २५८ मुख्याध्यापक, २२० शिक्षक, २२२ विद्यार्थी व ७ जिल्हा स्तरीय शाळा तपासणीस यांच्याकडून प्रश्नावलीद्वारा संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविली.

**निष्कर्ष :-**

१. फैजाबाद विभागातील ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षणाबाबत योग्य त्या सुविधा पुरविण्यात प्रतापगढ हा सर्वात प्रगत जिल्हा आहे तर गोंडा या सर्वात मागसलेला जिल्हा आहे. विभागात केवळ २ टक्के स्वत्रंत शाळा मुलींच्यासाठी आहेत. मुलामुलींना एकत्र शिक्षण देण्याऱ्या शाळांची संख्या ९७ टक्क्यापेक्षा अधिक आहे. जवळपास ४० टक्केपेक्षा अधिक शाळा रस्त्यालगत नाहीत तर १५ टक्के शाळा पोस्ट आफिस पासून १ किलोमीटर अंतरावर आहेत.

२. ३/४ प्राचार्यांना असे वाटते की शिक्षणावर १०० टक्के शासकीय नियंत्रण असवयास पाहिजे. शिक्षण विभागातील अनेक अधिकाऱ्यांचा मुल्यमापनाबाबतचा दृष्टिकोन योग्य नाही.

३. १/४ संस्थांच्या बाबतीत संस्थाचालकांची भूमिका समाधानकारक नाही. व्यवस्थापनाचा शाळेच्या कामकाजात राज्यकीय हस्तक्षेप दिसून आला.

४. प्राचार्यांच्या अधिकाऱ्यांवर बंधने व मर्यादा आहेत. त्यांच्यावरती शासन व व्यवस्थापन यांची नियंत्रण असल्याने त्याचा त्यांचे कामावर विपरीत परिणाम होतो. विज्ञान, गणित, इंग्रजी, वाणिज्य इत्यादी विषयासाठी उत्तम शिक्षक नाहीत. शिक्षकांना व्यवसाय प्रगतीच्या संधी कमी आहेत.

५. अर्ध्यापेक्षा अधिक शाळेत बहुतांश कार्यालयीन कर्मचारी समाधानी आहेत. ३/४ शिक्षकांना असे वाटते की प्राचार्यांचे कार्यलयीन कर्मचाऱ्यांवर नियंत्रण नाही.

६. २/३ पेक्षा जास्त शाळेकडे शालेय इमारत अपुरी आहे. अर्ध्यापेक्षा अधिक शाळेत प्रयोग शाळा, शैक्षणिक साहित्य आढळून आले नाही. ९३ टक्क्यापेक्षा अधिक शाळेत स्वतंत्र्य वाचन कक्षाची सोय नसल्याचे दिसून आले.

७. केवळ १/३ शाळेमध्येच समाधानकारक क्रिडासाहित्य उपलब्ध आहे. शासन नियमानुसार अनुदानाचा विनियोग होत नाही.

८. विभागीय मंडळाकडून नियमानुसार घेतल्या जाणाऱ्या परिक्षेशिवाय इतर अंतर्गत परिक्षांबाबत शाळा गंभीर नसल्यांचे दिसून आले.

९. ९२ टक्क्यापेक्षा अधिक शाळांची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नाही.

**८. पाटील व्ही. आर.**

"उस्मानाबाद जिल्ह्याचे शैक्षणिक सर्वेक्षण."

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, पीएच.डी., १९८९.

**उद्दिष्टये :-**

१. जिल्ह्यातील जनतेच्या भौगोलिक, सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. प्राथमिक, माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षणाच्या प्रगतीचा ऐतिहासिक मागोवा घेणे.

३. जिल्ह्यातील सर्व स्तरावर अस्तित्वात असलेल्या विविध शैक्षणिक सुविधांचा अभ्यास करणे.

४. शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी व शैक्षणिक सुविधा वाढीसाठी शिफारशी सुचविणे.

कार्यपध्दती :-

शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेले अहवाल, परिपत्रके व संदर्भ साहित्याच अभ्यास करून संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती मिळविली. जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांची प्रतवारी तयार केली. मुख्याध्यापक व शिक्षण अधिकारी यांचेकडून प्रश्नावलीद्वारा संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविली.

निष्कर्ष :-

१. जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या अपुरी आहे.

२. एक शिक्षकी शाळांचे प्रमाण अधिक आहे.

३. शैक्षणिक मासिके व ग्रंथ याबाबत सर्व शाळा कमकुवत आहेत.

४. प्पिण्याच्या पाण्याची सोय बऱ्याच शाळेत नाही.

५. शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण मिळणे गरजेचे आहे.

**९. फडके व्ही. वाय.**

"महाराष्ट्रातील माध्यमिक शिक्षणांच्या विकासात राज्य सरकारची भूमिका." पीएच्.डी., शिक्षणशास्त्र, मुंबई विद्यापीठ - १९८२.

उद्दिष्ट्ये :-

१. माध्यमिक शिक्षणाच्या रचनेत राज्य सरकारने काही अमुलाग्र बदल सुचविले आहेत काय? असतील तर त्याचा अभ्यास करणे.

२. माध्यमिक शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांना योग्य त्या संधी पुरविण्यात कितपत यश आले आहे याचा अभ्यास करणे.

३. शालेय अभ्यासक्रम व सहशालेय उपक्रम यांचे आधुनिकीकरण करण्यात राज्य सरकारला कितपत यश आले आहे याचा अभ्यास करणे.

४. परिक्षा पध्दतीत काही बदल अवलंबिले आहेत काय? असतील तर त्याचे स्वरूप आणि परीणाम याचा अभ्यास करणे.

५. माध्यमिक शिक्षकांना योग्य ती सेवासुरक्षितता, वेतन व इतर सुविधा मिळतात काय? याचा अभ्यास करणे.

६. मुलींचे शिक्षण, मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि वंचितांचे शिक्षण यांचेसाठी

शासनाने काही विशेष प्रयत्न केले आहेत काय? याचा अभ्यास करणे.

**कार्यपध्दती :-**

ऐतिहासिक पध्दतीने सर्वप्रथम संशोधनास आवश्यक असणारी काही माहिती जमा केली. काही माहिती तज्ञ वकील, माजी शिक्षण संचालक आणि उपसंचालक यांच्याकडून मिळविली. माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक आणि कांही शिक्षण अधिकारी यांच्याकडून प्रश्नावलीद्वारा माहिती मिळविली. वेगवेगळ्या शिक्षणविषयक नियतकालीकातून, मासिकातून, ग्रंथातून आणि शासनाच्या विविध परिपत्रकातून आवश्यक ती माहिती मिळविली.

**निष्कर्ष :-**

१. राज्य सरकारने स्त्रीशिक्षण, वंचितांचे शिक्षण, मराठीचा विकास, शाळेय अभ्यासक्रम, सहशालेय उपक्रमातील सुधारणा, शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण, परिक्षा पध्दती, पर्यवेक्षणातील सुधारणा इत्यादी बाबातीत आपली बांधिलकी व्यक्त केलेली आहे.

२. शासन शिक्षणाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करत नसून त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देत नाही.

३. अत्यंत कमी शाळेत व्यवसायिक अभ्यासक्रमाचे कोर्सेस सुरू आहेत.

४. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण अधिक आहे.

५. शैक्षणिक प्रशासनात बदल करण्याची आवश्यकता आहे.

६. राज्य सरकार सर्व विद्यार्थ्यांना कमी कमींतीत पुस्तके पुरविण्यात यशस्वी ठरले आहेत.

७. विविध अध्यापक महाविद्यालयाच्या माध्यमातून माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षीत करण्यात राज्य सरकारला मोठे यश प्राप्त झाले आहे.

**१०. शहा एम्. आर.**

"भारतातील शैक्षणिक प्रशासनाच्या काही समस्या."

**उद्दिष्ट्ये :-**

१. भारतातील शैक्षणिक प्रशासनाचा अभ्यास करणे.

२. शैक्षणिक अर्थशास्त्रांचा अभ्यास करणे.

३. शैक्षणिक प्रशासनातील विविध टप्पे (केंद्रीय, राज्यपातळी, स्थानिक स्वराज्य संस्था इ.) यांचा अभ्यास करणे.
४. शिक्षणांच्या समस्या जाणून घेणे.

**कार्यपध्दती :-**

भारतातील शिक्षणाचा इतिहास, शैक्षणिक प्रशासन याविषयांवरील विविध पुस्तकांचा अभ्यास करून व शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेले अहवाल व परिपत्रके यांचा अभ्यास करून संशोधकांने संशोधन कार्यासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविली.

**निष्कर्ष :-**

१. ब्रिटिशांच्या राजवटीत शैक्षणिक प्रशासन हे एककेंद्री व नोकर शाहीच्या हातात होते.
२. सर्व शिक्षक प्रशिक्षित असावेत.
३. शैक्षणिक संघटन सुधारण्यात यावे.
४. प्रशासनाचे वेगळे प्रशिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात यावे.
५. केंद्र व राज्य सरकारने शिक्षणावरील आर्थिक तरतूद वाढवावी.

**११. शर्मा ओ. पी.**

"भारतातील शालेय शिक्षणमंडळांच्या प्रशासनाचा तुलनात्मक अभ्यास."
पीएच्.डी. शिक्षणशास्त्र, हिमाचल प्रदेश विद्यापीठ - १९८७.

**उद्दिष्टये -**

१. भारतातील विविध शिक्षण मंडळांची प्रशासकीय रचना व कार्यपध्दती यांचा अभ्यास करणे.
२. त्यांच्या प्रशासकीय यशापयशाचा अभ्यास करणे.
३. तुलनात्मक अभ्यासातून मंडळांच्या यशस्वीतेसाठी उपाय सुचविणे. (विशेष संदर्भ हिमाचल प्रदेश शालेय शिक्षण मंडळ)

**कार्यपध्दती :-**

विविध शिक्षण मंडळांचे नियम व कायदे यांचा अभ्यास करून संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविली. आवश्यक त्याठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रश्नावलीद्वारा व प्रत्यक्ष चर्चेतून माहिती मिळविली.

**निष्कर्ष :-**

१. काही मंडळांची ध्येये आगि उद्दिष्ट्ये स्पष्ट स्वरूपात दिलेली नसून ती संदीग्ध सुरूपाची आहे. मंडळांची रचना सर्व ठिकाणी सारखीच नसून मंडळाच्या अध्यक्ष निवडीसाठीही वेगवेगळे निकष आहेत.

२. मंडळाच्या कार्यप्रणालीत उत्तम प्रशासणाचा अभाव आहे.

३. कांही मंडळे इतर मंडळाच्या तुलनेत शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या शैक्षणिक प्रगतीवर अधिक लक्ष केंद्रित करतात. बहुतांश मंडळात पहिली ते बारावी वर्गासाठी ठरवून दिलेला अभ्यासक्रम आहे. कांही मंडळे पत्र व्यवहारद्वारा अभ्यासाचे कोर्सेस चालवितात. अनेक मंडळांना स्वतःच्या मालकीची जागा नाही.

**२.०४ समारोप.**

वरील सर्व संशोधनाच्या अभ्यासातून संशोधकाची संशोधन कार्याची दिशा निश्चित झाली. त्याचबरोबर प्रस्तुत संशोधन मूलभूत व नाविण्यपूर्ण आहे हे ही लक्षात आले.

संबंधित संशोधन साहित्याचा अभ्यास करताना संशोधकाच्या असे निदर्शनास आले की, शैक्षणिक संशोधनामध्ये माध्यमिक शिक्षणावरती झालेले संशोधन प्राथमिक शिक्षणाच्या तुलनेत संख्येने कमी आहे. विशेषतः शैक्षणिक प्रशासनावरती झालेले संशोधन संख्येने कमी आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशासकीय समस्यांच्या अभ्यासावरती झालेले संशोधन अत्यंत कमी आहे.

माध्यमिक शिक्षण हा वास्तविक पाहता शिक्षणातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. शिक्षणाधिकारी हा जिल्हा स्तरावरील महत्त्वाचा प्रशासकीय अधिकारी आहे. जिल्ह्यातील शिक्षणविषयक संपूर्ण परिस्थितीचा अहवाल त्यांना दरवर्षी वरिष्ठांकडे सादर करावा लागतो. जिल्ह्यात दरवर्षी माध्यमिक शाळांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ आहे. प्रशासनाची रचना मात्र जशास तशी कायम आहे म्हणून वाढत्या शाळेची तपासणी करणे, त्यांच्या समस्या सोडविणे, त्यांना मार्गदर्शन करणे याशिवाय शासनाची विविध शिक्षण विषयक धोरणे यशस्वीरित्या राबविणे याबाबी शिक्षणाधिकाऱ्यांस अवघड होत आहेत. दिवसेंदिवस शाळेतील कर्मचाऱ्यांच्या समस्या वाढत असून कर्मचाऱ्यांची प्रकरणे शाळा न्यायाधिकरणाकडे जात आहेत. ही बाब देखील प्रशासनास वेळखाऊ होत आहे. त्याचा परिणाम दैनंदिन कामकाजावरती होत आहे.

सद्यपरिस्थित माध्यमिक शिक्षणाद्वारे माध्यमिक शिक्षणाची ध्येये व उद्दिष्ट्ये साध्य होतात काय? त्यासाठी प्रशासनाकडून आणि शाळेकडून कोणते प्रयत्न केले जातात? या बाबींचाही अभ्याय करण्यांची गरज आहे.

ठरवून दिलेल्या योजनांची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याची महत्त्वाची जबाबदारी प्रशासनाची आहे. यशस्वीतेसाठी योग्य ती कार्यवाही महत्त्वाची असते. त्यादृष्टिने उद्दिष्टपूर्तीसाठी प्रशासक हा अभ्यासू, कर्तव्यतत्पर, निर्णय क्षमता असलेला असला पाहिजे. प्रशासकास दैनंदिन कामकाजाबरोबरच उद्दिष्टपूर्तीवरतीही लक्ष द्यावे लागते. पंरतु प्रत्यक्ष दर्शनी असे लक्षात येते की आज प्रशासकाचा अधिकाधिक वेळ दैनंदिन कामकाजात व कर्मचाऱ्याच्या समस्या सोडवण्यातच खर्च होतो. म्हणून प्रशासनास नेमक्या कोणत्या समस्यांचा सामना करावा लागतो? त्या कशा सोडवता येतील? त्याचा प्रशासनावर परिणाम होतो का? या बाबतीत प्रस्तुत संशोधन संशोधकास विशेष महत्त्वाचे वाटले.

या दृष्टिकोनातूनच संशोधकाने माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशासकीय समस्यांचा अभ्यास हा विषय संशोधन कार्यासाठी निवडला.

## संदर्भ


1. Vajpai M. - Fourth Survey of Research in Education. Volume - II 1983 - 88 M.B. Buch, NCERT New Delhi . Page - 1072, 1073.
2. Baruah H. - Fourth Survey of Research in Education. Volume - II 1983 - 88 M.B. Buch, NCERT New Delhi . Page - 1073, 1074.
3. Devi B. - Fourth Survey of Research in Education. Volume - II 1983 - 88 M.B. Buch, NCERT New Delhi . Page - 1080, 1081.
4. Inamdar N.R. - A Pilot Study by Indian Council of Social Science. New Delhi .- 1971.
5. Kulkarni N.B. - Fourth Survey of Research in Education. Volume - II 1983 - 88 M.B. Buch, NCERT New Delhi . Page - 1089, 1090.
6. Misra B.M. - Fourth Survey of Research in Education. Volume - II 1983 - 88 M.B. Buch, NCERT New Delhi . Page - 1094, 1095.
7. Misra RamKishor - Fourth Survey of Research in Education. Volume - II 1983 - 88 M.B. Buch, NCERT New Delhi . Page - 1095, 1096.
८. पाटील व्ही. आर. - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. संशोधन संपदा, नागपूरे व.रा., शिक्षणशास्त्र संस्था, रौप्य महोत्सवी वर्ष प्रकाशन पुणे - ३०, १९६४ - १९८९. पृष्ठे - ३२ ते ३४.
9. Phadke V.Y. - Fourth Survey of Research in Education. Volume - II 1983 - 88 M.B. Buch, NCERT New Delhi . Page - 1108 - 1109.
10. Shaha M.R. - A Survey of Research in Education, M.B. Buch, First Edition, Baroda Cetre of Advanced Study in Education, Maharaja Sayajirao University . 1974, Page - 647
11. Sharma O.P. - Fourth Survey of Research in Education. Volume -II 1983 - 88 M.B. Buch, NCERT New Delhi . Page - 1120.